# जनसंपर्क अधिकारी


## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


३३३ - २३ दिनांक : - २५/०९/२०२३

**घरफोडी चोरी करणारे २ आरोपी अटक करुन ५ गुन्हयंची उकल**

**उत्तन सागरी पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीरण पथकाची कामगीरी.**

उत्तन सागरी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्यादी नामे श्री.अमय सुशिल पटनायक, वय.५८ वर्षे, व्यवसाय- इस्टेट एजेन्सी यांचे धावगी रोड, रॉयल स्कुलजवळ, एडु कंपाउंड नं.०२, उत्तन, भाईंदर (प.) येथील बंद घराचे खिडकीचे ग्रील तोडून त्यावाटे प्रवेश करुन एल.जी.कंपनीचा टीव्ही, पाण्याचे मीटर, साडया, रोख रक्कम असा एकूण २२,०००/- किंमतीचा मुद्देमाल चोरी गेला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन उत्तन सागरी पोलीस ठाणे गु.र.नं. ११६/२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये दि.२१/०९/२०२३ रोजी गुन्हा दाखल करणेत आलेला होता.

गुन्हा दाखल झालेनंतर पो.स्टे.उत्तन अधिनस्त पथकाचे मार्फतीने गुन्हयाचा तपास सुरु करणेत आला. वेगवेगळया ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासणी करणेत आली. प्राप्त सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण करून रेकॉर्डवरील संशयित गुन्हेगारांकडे तपासणी सुरु केली. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. दत्तात्रय सोनवलकर,पो.हवा.उत्तम जाधव, विजेंद्र दिवेकर, साबळे यांनी सापळा रचून आरोपी नामे १)अतुल कंठीराम कांबळे ,वय.२४ वर्षे रा.धावगी डोंगर, उत्तन, भाईंदर पश्चिम, जि.ठाणे २) अकबर तोफाज शेख, वय.२२ वर्षे, रा.धावगी डोंगर, उत्तन, भाईंदर पश्चिम, जि.ठाणे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे सखोल विचारपूस केली असता त्यांचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न झल्याने वर नमुद गुन्हयांत सदर आरोपीत यांना दिनांक दि.२२/०९/२०२३ रोजी अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपीत यांचेकडे पोलीस कोठडीमध्ये असताना अधिक चौकशी केली असता त्यांचेकडुन उत्तन सागरी पोलीस ठाणे अभिलेखावरील एकुण ५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. गुन्हयांमधील एकुण १,२४,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आलेला आहे.

**- उघडकीस आलेले गुन्हे-**

| अ.कं. | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|
| १ | ११६ /२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४,४५७,३८०,३४ प्रमाणे (मुळ गुन्हा ) |
| २ | ११३ / २०२३ भा.दं.वि.सं कलम ३७९,३४ प्रमाणे |
| ३ | ९५/२०२३ भा.दं.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | ९४/२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४ ४५७ ३८० प्रमाणे |
| ५ | ४५/२०२३ भा.दं.वि.सं कलम ४५४ ४५७ ३८० प्रमाणे |

सदर कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उपायुक्त परिमंडळ ०१, श्रीमती दीपाली खन्ना सहा.पोलीस आयुक्त भाईंदर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली उत्तन सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम करांडे, पोलीस निरीक्षक,श्री.प्रकाश मासाळ (गुन्हे), स.पो.नि. दत्तात्रय सोनवलकर, स.फौ.कवडे, पो.हवा. उत्तम जाधव, मंगेश शिंदे, विजेंद्र दिवेकर, छोटु साबळे, तुषार पाटील, राजेंद्र आसबले, पो.अं.हनुमंत माने. यांनी केली आहे.

